दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३०७ वा | शनिवार दि. २ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## जालन्यात मराठा आंदोलकांवर पोलिसांचा लाठीचार्ज



**जालना ।** जालन्याच्या अंतरवाली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी लाठीमार केला आहे. हे आंदोलक गेल्या तीन दिवसांपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत होते. त्यांची शुक्रवारी पोलिसांसोबत बाचाबाची झाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर अचानक लाठीमार सुरू केला. या घटनेमुळे या भागात मोठा तणाव निर्माण झाला आहे. दरम्यान, धुळे-सोलापूर महामार्गावर ३ गाड्या पेटवण्यात आल्या, तसेच १०-१५ गाड्यांवर दगडफेक करण्यात आल्याचे समजते आहे.

## न्यूज कॉलम

### चालकास मारहाण; चौघांवर गुन्हा

**धुळे ।** अपेक्षित स्थळावर एसटी बस न थांबवता पुढे थांबवली, या कारणावरुन वाद घालून चौघांनी बसचालकाला मारहाण केली. याप्रकरणी शिंदखेडा पोलिस ठाण्यात चौघांविरूद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल झाला. याबाबत प्रमोद प्रकाश पाटील (रा. कापडणे ता.धुळे) बसचालकाने फिर्याद दिली. प्रमोद पाटील हे परिवहन महामंडळाच्या दोंडाईचा डेपोचे चालक आहेत. पोलिसांनी प्राप्त फिर्यादीवरून दिनेश साहेबराव गिरासे, संजय नारायण गिरासे, राजेंद्र अशोक गिरासे, पिंटू गिरासे (सर्व रा. देवी ता. शिंदखेडा) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला.

### देवपुरात घरफोडी; दागिने लंपास

**धुळे ।** काही दिवसांपासून शहरासह परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. चोऱ्यांवर अंकुश लावण्यात पोलिस अपयशी ठरले असल्याचे दिसून ये आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा आला. देवपुरातील बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी दागिने तसेच ७ हजार रुपयांची रोकड लांबवली. कुटुंबीय गावी गेले असताना ही चोरी झाली. या प्रकरणी तसलीमबी सलिम मलक यांच्या तक्रारीवरून देवपूर पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इंडिया आघाडीच्या बैठकीत समन्वय समितीची स्थापना

### शरद पवार, संजय राऊतांसह १३ जणांचा समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

विरोधी पक्षांची आघाडी असलेल्या इंडिया आघाडीची ची बैठक मुंबईत सुरू आहे. सर्व घटकपक्षांची बैठक सध्या सुरू आहे. या बैठीकत इंडिया आघाडीच्या बैठकीत समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे. समन्वय समितीत १३ जणांचा समावेश करण्यात आला आहे. इंडिया आघाडीला पुढे नेण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच इंडिया आघाडीच्या बैठकीत महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले आहेत.

पक्षाचे वरिष्ठ नेते हे या समन्वय समितीच्या माहितीनुसार पुढील काम करणार आहेत. ही समन्वय समिती देशभरात फिरणार असून पुढील अजेंडा ठरणार आहे. या समितीमध्ये महाराष्ट्रातून शरद पवार आणि संजय राऊत असणार आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीच्या दुसऱ्या दिवशी या आघाडीने जागा वाटपाच्या मुद्यावर आपली १४ सदस्यीय समन्वय समिती स्थापन केली. यात समितीत महाराष्ट्रातील शरद पवार व शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना स्थान देण्यात आले आहे.

याशिवाय या समितीत काँग्रेसचे केसी वेणुगोपाल, द्रमुकचे एम के स्टॅलीन, राजदचे तेजस्वी यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, आपचे राघव चड्ढा, सपचे जावेद अली खान, जदयुचे लल्लन सिंह, झामुमोचे हेमंत सोरेन, सीपीआयचे डी राजा, नॅशनल कॉन्फरंसचे ओमर अब्दुल्ला व पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांचा या समितीत समावेश आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे इंडियाच्या या बैठकीत आघाडीच्या लोगोवर मतैक्य होऊ शकले नाही. त्यामुळे त्याचे अनावरण करण्याचा निर्णय लांबणीवर टाकण्यात आला. या प्रकरणी ६ लोगो डिझाईन व शॉर्टलिस्ट करण्यात आले होते. त्यापैकी १ सर्वांना आवडला. पण त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे. याबाबतचा निर्णय पुढील बैठकीत घेतला जाणार आहे. इंडिया आघाडीची ही महत्त्वकांक्षी बैठक हॉटेल ग्रँड हयात येथे झाली.

बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, इंडिया आघाडी मजबूत होत जाईल, तसे तिच्या सदस्यांवर छापे वाढतील. तसेच नेत्यांना अटक होण्याचे प्रमाणही वाढेल. ३१ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीच्या पहिल्या दिवशी २८ पक्षांचे नेते उपस्थित होते. या सर्व नेत्यांनी देश व संविधान वाचवण्यासाठी एकत्र आल्याचा दावा केला आहे.




#### समितीत २ मुख्यमंत्री, १ उपमुख्यमंत्री

**विरोधकांच्या आघाडीच्या १३ सदस्यीय समितीत २ मुख्यमंत्र्यांना स्थान मिळाले आहे. यात तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन व झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांचाही यात समावेश आहे. ओमर अब्दुल्ला व मेहबुबा मुफ्ती या २ माजी मुख्यमंत्र्यांनाही यात स्थान देण्यात आले आहे. केसी वेणुगोपाल (काँग्रेस), संजय राऊत (शिवसेना यूबीटी), शरद पवार (राष्ट्रवादी), राघव चड्ढा (आप) व जावेद अली खान (एसपी) हे ५ राज्यसभा खासदार आहेत. याशिवाय २ लोकसभा खासदार लल्लन सिंह (जदयु), अभिषेक बॅनर्जी (टीएमसी) यांनाही समितीच्य सदस्यपदी स्थान देण्यात आले आहे. या समितीमधील डी राजा हे एकमेव सदस्य आहेत जे लोकसभेत किंवा राज्यसभेचे सदस्य नाहीत.**

#### शेतकऱ्यांसाठी काम करणार

**इंडिया आघाडी देशातील ६० टक्के जनतेचे प्रतिनिधित्व करते. आमच्या व्यासपीठावरून हे स्पष्ट होते. विरोधकांचे आजचे चित्र पाहून भाजपचा आगामी लोकसभा निवडणुकीत पराभव होणार असल्याचे स्पष्ट होते. भाजपचा आता कोणत्याही स्थितीत विजय शक्य नाही. या प्रकरणी आम्ही समन्वय समिती स्थापन केली आहे, असे राहुल गांधी म्हणाले. भाजप सरकार गरीबांचे पैसे उद्योगपतींना देत आहे. गरीब शेतकऱ्यांसाठी आम्ही काम करणार आहोत. इंडिया आघाडी भाजपला हरवणार असल्याचा विश्वास देखील राहुल गांधी यांनी व्यक्त केला.**

#### एकजुटीमुळे विरोधकांमध्ये घबराट

**येत्या निवडणुकीत हुकूमशाही आणि भाषण बाजीविरोधात लढण्याचा निर्धार आपण सर्वांनी केला आहे. आम्ही ऐकले होते - सबका साथ, सबका विकास. निवडणूक जिंकल्यानंतर मित्रमंडळी वाढली आणि त्यांचा विकास झाला. आमच्या एकजुटीमुळे विरोधकांमध्ये घबराट आहे. आम्ही क्रोनिझमच्या विरोधात लढू. घाबरू नका, आम्ही भयमुक्त भारत घडवणार आहोत. अखेर सरकारने अचानक संसदेचे विशेष अधिवेशन का बोलावले? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.**

# बोरविहिर-नरडाणा रेल्वेमार्गात जमीन गेलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ३५ लाख रुपये मोबदला द्या!

### खा.डॉ. सुभाष भामरे यांची रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवेंकडे मागणी

**धुळे । प्रतिनिधी**

मनमाड-इंदोर रेल्वे मार्गाच्या प्रथम टप्याचे काम सुरु झाले आहे. बोरविहीर (धुळे) - नरडाणा नवीन रेल्वे मार्गात जमीन गेलेल्या शेतकर्यांना हेक्टरी ३५ लाख रुपये मोबदला द्यावा, अशी मागणी खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे. त्यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची नुकतीच प्रत्यक्ष भेट घेतली.

धुळे जिल्ह्यातील नागरिकांच्या अतिशय जिव्हाळ्याचा मनमाड- धुळे- इंदोर रेल्वे मार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरु झाले आहे. बोरविहीर (धुळे) - नरडाणा या दरम्यानच्या रेल्वे मार्गासाठी भूमीअधिग्रहणाचे काम पूर्ण झाले आहे. या रेल्वे मार्गामुळे शेतकर्यांची जमीन संपादित करण्यात आली आहे. शासन नियमाप्रमाणे दर हेक्टरी ४ ते ५ लाख रु. शेतकर्यांना देण्यात येणार आहेत. सदरची ५ लाख रुपये हि रक्कम तुटपुंजी आहे.



शेतकर्यांना जास्तीत जास्त ३५ लाख रुपये प्रति हेक्टरी मिळावे अशी मागणी धुळे लोकसभेचे खासदार तथा माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे यांनी देशाचे रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे. खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी दिल्लीत येथे त्यांची नुकतीच भेट घेतली. शेतकर्यांना जास्तीत जास्त हेक्टरी ३५ लाख रु. मोबदला मिळावा, अशी आग्रही मागणी खा.डॉ. भामरे यांनी ना. दानवे यांच्याकडे केली. शेतकर्यांच्या जमिनीचा प्रश्न किती महत्वाचा आहे हे त्यांना पटवून दिले. शेतकर्यांच्या या प्रश्नांची शासनस्तरावरून दखल घेण्यात येईल, असे सुस्पष्ठ आश्वासन ना. रावसाहेब दानवे यांनी दिले आहे.

## मुंबई कुणाचा बापही वेगळी करू शकत नाही: फडणवीस

**मुंबई ।** काही जण मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा कट रचण्यात आल्याचा दावा करतात. उद्धव ठाकरे याविषयी बोलतात याचे मला आश्चर्य वाटत नाही. कारण, निवडणुकीच्या तोंडावर ते नेहमीच अशी भाषा करतात. मुंबई ला महाराष्ट्रापासून कुणीही वेगळे करू शकत नाही. असे करण्याची कुणाच्या बापाची हिंमत नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी ठणकावून सांगितले. ते महायुतीच्या बैठकीनंतर बोलत होते. देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, यांनी कधीच मुंबईचा विकास होऊ दिला नाही. कायम मराठी माणसात भय ठेवले. मुंबईच्या विकासाला जो विरोध करतो तो महाराष्ट्रद्रोही आहे.

# बाळासाहेब भदाणेंच्या नेतृत्वात तरवाडेत रास्ता रोको

### धुळे तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**धुळे । प्रतिनिधी**



तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसाठी तरवाडे (ता.धुळे) येथे इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे बाळासाहेब भदाणे यांच्या नेतृत्वात रास्ता रोको करण्यात आला. धुळे तालुक्यासह जिल्ह्यात पावसाने पाठ फिरविल्याने परिस्थिती भीषण व भयावह आहे. पिके करपली, जलसाठे आटलेत, जनावरांचा चाराही संपलाय. शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहिर करत, शेतकरी बंधूंना मदतीचा हात द्यावा. आतापासूनच उपाययोजनांचे नियोजन करावे. रस्त्यावर उतरुन अजुन तिव्र आंदोलन छेडण्याची वेळ शासनाने आणू नये. तात्काळ दुष्काळ जाहिर न केल्यास धुळे तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी चक्का जाम केला जाईल, असा इशारा यावेळी बाळासाहेब भदाणे यांनी दिला.


बाळासाहेब भदाणे मित्र परिवारातर्फे झालेल्या या चक्का जाम आंदोलनामुळे महामार्गावर वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला संबोधीत करताना बाळासाहेब भदाणे यांनी, शेतकरी बंधूंनो हवालदिल न होता परिस्थितीशी दोन हात करा, सर्व पर्याय संपले तरीही टोकाचे पाऊल मात्र उचलू नका, असे भावनिक आवाहनही केले.

यावेळी इंदुबाई भदाने प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, जि.प. सदस्य प्रभाकर पाटील, पं.स.उपसभापती देवेंद्र माळी, पं.स. सदस्य बाबाजी देसले, माजी सभापती नारायण देवरे, बोरकुंड सरपंच सुनिता हेमंत भदाणे, नाणे सरपंच अजय राजपूत, प्रकाश भदाणे, होरपाडाचे माजी सरपंच रवींद्र कठाळे, राजेंद्र मराठे, आदींसह बाभुळवाडी, हडसुणे, मोरदड, मोरदड तांडा, नाणे, सिताणे, तरवाडे, धाडरे, धाडरी, हेंद्रुण आदी गावांतील व बोरी पट्ट्यातील विविध पदाधिकारी तसेच तालुकाभरातील शेकडो शेतकरी बंधू उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब भदाणे पुढे बोलताना म्हणाले की, सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने धुळे तालुक्यासह सर्वदूर बिकट परिस्थिती आहे. शासनाने कोरडा दुष्काळ जाहिर करत गुरांसाठी चारा छावणी, पाण्याची समस्या असेल तिथे टॅकरची सोय, शेतकरींना भरीव मदत आदींचे नियोजन करावे. लवकरात लवकर पंचनामे करत कोरडा दुष्काळ जाहिर करावा. यावेळी रावसाहेब पाटील, भूषण मासोळे, प्रकाश भदाणे, किशोर अहिरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# गौतमी पाटीलचे वडील आढळले दयनीय अवस्थेत

### रस्त्याच्या कडेला पडले होते बेशुद्धावस्थेत

**धुळे । प्रतिनिधी**



गौतमी पाटीलचे वडील रवींद्र बाबुराव पाटील हे धुळे शहरापासून काही किलोमीटर अंतरावर असलेल्या सुरत बायपास रस्त्यावर बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. सामाजिक कार्यकर्त्यांना ते अत्यंत दयनीय अवस्थेमध्ये आढळून आल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सुरत बायपास रस्त्यावर अज्ञात व्यक्ती मृताअवस्थेत पडलेला असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्यांना मिळाली. या माहितीवरून सामाजिक कार्यकर्ते सदर व्यक्ती जवळ पोहोचले. त्यांना हळुवार श्वास सुरू असल्याचे दिसून आले. त्यांनी तात्काळ या व्यक्तीस शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. परंतु ही व्यक्ती कोण? याबाबत कुठलीही माहिती न घेता या सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांना थेट शासकीय हिरे वैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर सदर व्यक्ती कोण यासंदर्भात माहिती घेण्यासाठी या सामाजिक कार्यकर्त्यांनी सोशल मीडियावर फोटो व पोस्ट व्हायरल केला असता त्यानंतर संबंधित व्यक्ती हे गौतमी पाटीलचे वडील असल्याचे समोर आले. गौतमी पाटीलच्या वडिलांची अशी दयनीय अवस्था समजल्यानंतर एकच खळबळ उडाली. त्यांना शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर हिरे वैद्यकीय शासकीय रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत.

### शांताराम मानसिंग चव्हाण प्रतिष्ठान आणि अ.भा.मराठी नाटय परिषद आयोजित

# पद्मश्री शाहीर साबळे राज्यस्तरीय लोकगीत स्पर्धा

**धुळे । प्रतिनिधी**

येथील शांताराम मानसिंग चव्हाण प्रतिष्ठान आणि अ.भा.मराठी नाटय परिषद, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे लोकप्रिय शाहीर पद्मश्री शाहीर साबळे यांच्या जन्मशताब्दी सांगता सोहळया निमित्त पद्मश्री शाहीर साबळे राज्यस्तरीय लोकगीत स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

छत्रपती शाहू महाराज नाटय मंदीर धुळे येथे दि.०३ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरु होणाऱ्या हया स्पर्धेत संपुर्ण महाराष्ट्रातील लोक कलावंत स्पर्धक सहभागी होत आहेत. विजेत्या स्पर्धकांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्व. मालतीबाई शांताराम चव्हाण स्मरणार्थ रोख रु.११,०००/- आणि स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक स्व. वेणुबाई मंगा जगताप स्मरणार्थ रोख रु.७,०००/- स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक स्व. वासुदेव गोविंद जोशी स्मरणार्थ रोख रु.३,०००/- स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ पारितोषिक स्व. सुशिलाबाई विक्रम पाटील स्मरणार्थ रोख रु. (१) २०००/-, (२) रु.१,५००/-,(३) रु.१,०००/- स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तसेच महीला लोक कलावंतांना विशेष प्रोत्साहनपर पारितोषिक आनंद लोंढे अध्यक्ष सारथी शैक्षणिक व सामाजिक संस्था पुरस्कृत प्रथम रोख रु.३०००/-,व्दितीय रोख रु.२०००/-, तृतीय रोख



रु.१०००/- या भव्य स्वरुपात पारितोषिके ठेवली आहेत. सर्व सहभागी सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील. वय मर्यादा २० च्या पुढ असणाऱ्या स्पर्धकांनी गण, गवळण, भारुड, अभंग, लावणी, पोवाडा आदी लोककला वैयक्तिक सादर करावयाच्या आहेत. सहभागी होण्यासाठी दि.०१ सप्टेंबर च्या आंत आपली नावे नोंदणी शुल्क रु.१००/- भरुन संयोजक अनिल जगताप (मो. नं.९८६०७८७४२२) यांचेकडे नोंदवावी. जास्तीत जास्त लोक कलावंतांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष पारिजात चव्हाण, नाटय परिषद, धुळेचे अध्यक्ष सुनिल नेरकर, नाटय परिषद नियामक मंडळाचे सदस्य, चंद्रशेखर पाटील, संयोजक अनिल जगताप, कवी जगदीश देवपूरकर, मा. नगरसेवक राजूनाना चौधरी, रविंद्र चौधरी, सुनंदाताई गोपाळ, पपीता जोशी, आबा चौधरी यांनी केले आहे.

# ग्रामीण भागात अनेक ठिकाणी विकास कामे निकृष्ट दर्जाची

शासनस्तरावरून कोट्यवधी रुपये ग्रामीण भागाच्या विकासासाठी खर्च केले जात आहेत. परंतु प्रत्यक्षात ग्रामीण भागाचा विकास होत आहेत का? ग्रामीण भागातील विकासकामे चांगल्या दर्जाची आणि ठरवलेल्या तपशीलाप्रमाणे होतात का? संबंधित अधिकारी अभियंता कामाच्या दर्जाची चौकशी करतात का? कामासाठी वापरण्यात येणारे साहित्य उदा. सिमेंट, विटा, डांबर, रेती, खडी इ. चांगल्या दर्जाचे वापरले जाते का? हे सर्व प्रश्न ग्रामीण भागातील जनतेला भेडसावत आहेत. ग्रामीण भागातील जनतेला ह्या सर्व गोष्टींची माहिती नसल्यामुळे कंत्राटदार, संबंधित अधिकारी/अभियंता यांचे चांगलेच फावत असल्याच्या तक्रारी आहेत.

ग्रामीण भागात रस्ते, पाणी पुरवठा, शासकीय इमारती, गटार,सार्वजनिक शौचालय इ कामे अगदीच निकृष्ट असल्याचे समोर आले आहे. कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात निकृष्ट दर्जाची कामे केली जात आहेत. ठेकेदार २० टक्के ते २५ टक्के कमी पैशात कमी करण्यासाठी तयार होतात. त्यात शासनाचा वस्तू व सेवा कर विभागाला १२.०५ टक्के कर द्यावा लागतो. एकूणच १० लाखाचे काम जर २५ टक्के कमीने घेतले तर त्यात १२.०५ टक्के वस्तू व सेवा कर भरून ६,२५,००० रुपये एवढी रक्कम उरते. तर शासनस्तरावर ज्या कामाचे अंदाजपत्रक १० लाख ठरवले जाते ते काम करण्यासाठी ठेकेदारकडे ६ लाख २५हजार रुपये उरतात आणि एवढ्या रकमेत ठेकेदार १० लाखाचे काम कोणत्या पद्धतीने करत असेल याकडे जाणकार लक्ष वेधत आहेत. सिमेंट, रेती, डांबर, विटा इ. साहित्यांची प्रयोगशाळेतून चाचणी करून घेणे आवश्यक असते. साहित्य योग्य प्रतीचे आहे की नाही त्यात काय-काय वापरले आहे तसेच बांधकाम टिकाऊ होणार की नाही तसेच ते काम निकृष्ट दर्जाचे होऊ नये यासाठी चाचणी अहवाल महत्वाचा असतो. मात्र तसे होताना दिसत नाही. त्यामुळेच बांधकाम एक-दोन वर्षातच फुटून-तुटून भंगार स्वरूपाचे झालेले दिसते तसे अधिकारी व कर्मचारीदेखील जबाबदारी घेण्यास तयार होत नाहीत. अशा कामांवर साहित्य चाचणी अहवाल घेणे गरजेचे असून याबाबत शासकीय स्तरावर दखल घेणे गरजेचे असताना त्याकडेही कानाडोळा केला जात असल्याचे समोर आले आहे.



#### गुणात्मक दर्जा गरजेचा

**कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायतीकडून अनेक विकास कामे होत आहेत.यातील अनेक कामे राजकीय दबावामुळे अशा स्वंयघोषित राजकीय ठेकेदारांनी घेतली आहेत.यात मुख्य ठेकेदार फक्त नाममात्र ठरत असून काही ठराविक रक्कम त्यांना देत विना अनभुवी राजकीय ठेकेदार दर्जाहीन कामे करत शासनाच्या निधीवर डल्ला मारत आहेत. तालुक्यातील अनेक विभागात हे राजकीय कार्यकर्ते ठेकेदार म्हणून वावरत आहेत.यापुर्वीच्या सत्तेतील चेहरे बदलेले दिसत आहेत.मात्र ठेकेदारीला ऊत आल्याचे स्पष्ट होत आहे. अधिकृत ठेकेदारांची अवस्था तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे.**

**शोध बातमी**



पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

## पुतळा जाळल्या प्रकरणी जि.प सभापतींसह आंदोलकांविरुध्द गुन्हा

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

तालुक्यातील नरडाणा येथील औद्योगिक वसाहतीमध्ये रसायन कारखान्यास परवानगी देत असल्याच्या निषेधार्थ उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रातिनिधीक पुतळ्याचे दहन केल्या प्रकरणी धुळे जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण सभापतींसह अन्य आंदोलकांविरुध्द नरडाणा पोलिसांनी गुन्हा दाखल झाला आहे.

३० ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजेला मुंबई-आग्रा महामार्गावर आंदोलन करुन रसायन उद्योगाला विरोध करण्यात आला होता. जिल्हयात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी १४ सप्टेंबर २०२३ पर्यंत विना परवानगी रास्तारोको किंवा अन्य आंदोलने करण्यास बंदी असतांना नरडाणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत आंदोलन करण्यात आले. नरडाणा औद्योगिक वसाहतीमध्ये रसायन उद्योग उभारण्यास उद्योग मंत्री उदय सामंत यांनी परवानगी दिली आहे. याबातमीमुळे परिसरातील शेतकरी नागरीकांनी आक्षेप घेतला. नरडाणा परिसरातील जमीनीची सुपिकता रसायन कारखान्यामुळे धोक्यात येणार असल्याने व पाण्याची शुध्दता राखली जाणार नसल्याने या बाबींचा जनजिवनावर विपरीत परिणाम होईल. यामुळे या भागात रसायन कारखाना उभारु नये, असा इशारा देण्यात आला.

## राखण्या मतदारांची मर्जी

अन्न धान्यावरील अनुदान, गॅस सिलिंडरची किंमत घटवणे याचा बोजा सरकारच्या तिजोरीवर येणार हे नक्की. जर पुन्हा भाजप सत्तेत आला, तर खेळी यशस्वी झाली असे ठरेल. दुसरा पक्ष आला तर ओझे त्यांच्यावर जाईल.

स्वयंपाकाच्या गॅसच्या सिलिंडरच्या किंमतीत दोनशे रुपयांची कपात नुकतीच जाहीर करण्यात आली. यामुळे घरगुती गॅस सिलिंडरची किंमत सरासरी ९०५ रुपये किंवा त्याच्या आसपास झाली. उज्ज्वला योजनेत सिलिंडरमागे अनुदान असतेच, त्यात वाढ झाल्याने आता या योजनेतील सिलिंडरसाठी साधारणपणे ७०३ रुपये मोजावे लागतील. ही घोषणा करण्यासाठी मोदी सरकारने मुहूर्त चतुराईने निवडला. देशातील कोट्यवधी भगिनींना आपली ही रक्षा बंधनाची भेट आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले. इतरांना नावे ठेवण्याबरोबरच, योजनांना नावे देणे, घोषणा करणे यात संघ व परिवार कुशल आहे. मोदी हे तर प्रचारकच आहेत. लोकसभेत मांडल्या गेलेल्या अविश्वास ठरावावरील चर्चेस दिलेले प्रदीर्घ उत्तर, नंतर स्वातंत्र्यदिनी केलेले दीर्घ भाषण आणि आता ही घोषणा; यावरून आगामी निवडणुकांसाठी भाजप व मोदी यांनी प्रचाराचे शिंग फुंकले आहे हे स्पष्ट होते. लोकसभा निवडणुकीस थोडा अवधी आहे. ती पुढील वर्षी एप्रिल-मे मध्ये होणार आहे; पण पाच राज्यांत विधानसभा निवडणुका यावर्षी होत आहेत. सत्ता असताना तिचा वापर पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी करण्याची ही योग्य व तातडीची वेळ नक्कीच आहे. त्यामुळेच विविध योजना व घोषणांचा सपाटा सुरु आहे.

शेतकर्यांना वर्षास सहा हजार रुपये देण्याची पंतप्रधान किसान योजना गेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन महिने जाहीर करण्यात आली होती. तिचा फायदा भाजपला तेव्हा मिळालाही होता. त्यावेळी देशाचा विकास दर मंदावला होता; पण सामान्यांच्या लक्षात ती बाब येत नाही. तेव्हा महागाई वाढीचा दर फार नव्हता. मात्र, गेले काही महिने महागाई वेगाने वाढत आहे. अन्नधान्य व खाद्य पदार्थांच्या किरकोळ महागाई वाढीचा दर जुलैमध्ये ११.५ टक्के झाला आहे. घाऊक किंमत निर्देशांकावार आधारित दरही ७.७५ टक्के झाला आहे. त्यातच यंदा पावसाने दगा दिला आहे. ऑगस्टचा महिना शतकभरातील कोरडा ठरला आहे. याचा अर्थ सणासुदीला खाद्य तेले, धान्य व जीवनावश्यक वस्तू महागणार हे नक्की आहे. कोणत्याही सरकारला निवडणुकीच्या वर्षात महागाई नको असते. २०१४ मध्ये आताच्या तुलनेत धान्य व तेलांचे दर कमी होते. तेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर प्रतिपिंप १०५ डॉलर्सपेक्षा जास्त होते तरीही भारतात पेट्रोल प्रतिलीटर ७२-७३ रुपयांच्या आसपास मिळत होते. असे असूनही भाजपने महागाई वाढल्याचा ओरडा केला होता. आता खनिज तेलाचे दर ८४ ते ९० डॉलर्सच्या दरम्यान आहेत, तरीही पेट्रोलच्या दराने कधीच शंभरी ओलांडली आहे. हा मुद्दा सरकार कौशल्याने चर्चेत येऊ देत नाही. दरवाढ, उत्पादन घटण्याची व त्यामुळे आणखी दरवाढीच्या भीतीने केंद्र सरकारने गहू, तांदूळ व कांद्याच्या निर्यातीवर बंदी आणली. यामुळे शेतकर्यांचे मोठे नुकसान होणार आहे. तरीही आपण शेतकरी विरोधी असल्याचा ठपका येऊ नये यासाठी धान्याच्या किमान आधार किंमतीत वाढ करण्यात आली. त्यामुळे सर्वसाधारण महागाई वाढण्याचा इशारा कृषी खर्च व किंमत आयोगाने, नीती आयोगाने व वाणिज्य विभागाने दिला होता; पण मोदी सरकारने तिकडे दुर्लक्ष केले. कर्नाटकातील निवडणुकीचा निकाल त्यांच्या समोर होता. आताही मध्य प्रदेश आणि राजस्तानात गॅसच्या सिलिंडरची किंमत कमी करण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे. त्याला काटशह देण्यासाठी मोदी सरकारने आधीच त्याची किंमत कमी केली. जर काही बोजा असेल, तर तो तेल कंपन्यांनी सोसायचा आहे. २०२२ च्या मे महिन्यापासून पेट्रोल-डिझेल यांचे दर वाढू दिलेले नाहीत. रशियाकडून स्वस्तात खनिज तेल मिळाल्याने बहुधा हे शक्य झाले असावे; पण शेवटी याचा भार सरकारी तिजोरीवर येणे अपरिहार्य आहे. तूट भरून काढण्यासाठी कर्ज घेण्याचा पर्याय सरकारच्या हाती असतो. आर्थिक तूट वगैरे बाबी गरीब व कनिष्ठ मध्यम वर्गास कळत नाहीत. त्यांना गॅसचा सिलिंडर स्वस्त मिळणे महत्त्वाचे असते. मग त्यांना मणिपूरचा मुद्दाही किरकोळ वाटतो. सध्या या मतदारांना जपणे भाजप व सरकारसाठी महत्त्वाचे आहे.

# फडणवीस यांच्या जपान दौऱ्याचे फलित

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच जपान दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विविध क्षेत्रांमधील उद्योगपतींची भेट घेतली. राज्यातील पायाभूत सुविधा, शिक्षण तसेच ऊर्जा क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यात या उद्योगपतींनी स्वारस्य दाखवले आहे. महाराष्ट्रात नेमकी किती गुंतवणूक येणार हे येत्या काही काळात स्पष्ट होईल. तथापि, महाराष्ट्राबाबत सकारात्मक संदेश देण्यात फडणवीस यांचा दौरा यशस्वी ठरला, असे नक्कीच म्हणता येते.**



महाराष्ट्रात थेट विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच जपानी कंपन्यांना गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच जपानचा दौरा केला. आपल्या पाच दिवसांच्या दौऱ्यात त्यांनी क्योटो, ओसाका आणि कानसाई येथील उद्योगपतींशी विविध क्षेत्रांमधील गुंतवणुकीबाबत चर्चा केली. यात पायाभूत सुविधा, शिक्षण तसेच आरोग्य या क्षेत्रांचा समावेश आहे. जपानी कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना जपानमध्ये शिक्षण घेण्यासाठी, प्रोत्साहित करण्यासाठी त्यांनी टोकियो येथील इंडियन हाऊसलाही भेट दिली. जपानी गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्र हे आदर्श ठिकाण असल्याचा दावा फडणवीस यांनी केला असून एफडीआयसाठी हे राज्य पहिल्या क्रमांकाचे गंतव्यस्थान असल्याचे प्रतिपादनही त्यांनी केले आहे. टोकियो ते क्योटो दरम्यानच्या शिंकनसेन सबुलेट ट्रेनचा प्रवास करत तिच्या वेग, अचूकता आणि नियोजनाचे त्यांनी कौतुक केले. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यावर मुंबई आणि जपान दरम्यानच्या उड्डाणांची संख्या वाढेल. यामुळे व्यावसायिक भागीदार तसेच गुंतवणूकदार या दोघांचाही फायदा होणार आहे.

केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात भारतातील एकूण एफडीआयच्या २६.२६ टक्के इतकी दुसऱ्या क्रमांकाची गुंतवणूक झाली. राज्यात पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, अक्षय ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान तसेच पोलाद उत्पादन यांसह एफडीआय आकर्षित करणारी विविध क्षेत्रे आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. येथेच प्रमुख कंपन्यांची मुख्यालये असून आशियातील सर्वात जुने बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजही आहे. औद्योगिक धोरण, २०१९ नुसार निर्यात प्रोत्साहन देण्यासाठी निर्यात प्रोत्साहन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनेअंतर्गत प्रत्येक जिल्ह्याला उदयोन्मुख निर्यात केंद्र बनवण्यासाठी जिल्हा निर्यात प्रोत्साहन परिषदांची स्थापना करण्यात आली आहे. हिंगणघाट, वसमत, लातूर, शिरपूर, धुळे आणि देगाव, भिवंडी, बारामती, इस्लामपूर तसेच इचलकरंजी येथे बारा टेक्स्टाईल पार्क आहेत. 'इन्व्हेस्ट इंडिया'च्या संकेतस्थळानुसार, महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या भरपूर संधी आहेत. राज्याला असलेली ७२० किलोमीटर लांबीची किनारपट्टी तसेच ५० बंदरे आहेत. त्यामुळे भारतातील एकूण माल वाहतुकीच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक वाहतूक सुलभ होते. जपानी गुंतवणूक आकर्षिक करणे, हा फडणवीस यांच्या दौऱ्यामागील प्रमुख हेतू होता. हिताची, सुमितोमो तसेच जायकासह जपानी आदी उद्योगांच्या प्रतिनिधींची त्यांनी घेतलेली भेट म्हणूनच महत्त्वाची होती. या कंपन्यांनी राज्यातील पायाभूत सुविधा, उत्पादन तसेच तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रात गुंतवणूक करण्यात स्वारस्य दाखवले आहे. ही गुंतवणूक प्रत्यक्षात आल्यानंतर राज्यात रोजगाराच्या हजारो संधी निर्माण होणार आहेत.

पर्यटनाला चालना देणे हाही फडणवीस यांच्या दौऱ्यामागील एक उद्देश होता. फडणवीस यांनी महाराष्ट्राला पर्यटन स्थळ म्हणून अधोरेखित केले. अनेक जपानी ट्रॅव्हल एजन्सींची भेट घेत त्यांनी राज्यातील पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी आमंत्रित केले. अजिंठा आणि एलोरा लेणी हे विदेशी पर्यटकांचे प्रमुख आकर्षणस्थळ आहे. अधिकाधिक जपानी पर्यटकांनी महाराष्ट्राला भेट दिल्यास राज्याच्या अर्थव्यवस्थेत अब्जावधी रुपयांची उलाढाल होऊ शकते. त्या बरोबरीने महाराष्ट्र-जपान संबंध वृद्धिंगत होतील, याचीही त्यांनी काळजी घेतली. म्हणूनच त्यांनी सरकारी अधिकारी तसेच व्यावसायिकांच्या भेटीगाठी घेतल्या. व्यापार, गुंतवणूक तसेच सांस्कृतिक देवाण-घेवाण यांसारख्या क्षेत्रात महाराष्ट्र तसेच जपानमधील सहकार्य वाढवण्यासंबंधी त्यांनी चर्चा केली. जपानसोबतचे संबंध दृढ झाल्यामुळे राज्याचा अनेक प्रकारे फायदा होणार आहे. जपानी तंत्रज्ञान आणि बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्याची संधी राज्याला मिळाली आहे. या व्यतिरिक्त फडणवीस यांच्या दौऱ्याचे अनेक सकारात्मक परिणाम दिसले आहेत. राज्याची विदेशातील प्रतिमा सुधारण्यास तसेच विदेशी गुंतवणूकदार आणि पर्यटकांसाठी महाराष्ट्र अधिक आकर्षित असल्याचे पटवून देण्यात त्याची मदत झाली आहे. महाराष्ट्राची संस्कृती आणि वारसा याबद्दल जागरूकता निर्माण होण्यासही मदत झाली आहे. जपानी गुंतवणूक आकर्षित करणे, पर्यटनाला चालना देणे तसेच परस्परसंबंध दृढ करणे यासह राज्याला या दौऱ्याचे अनेक फायदे झाले.

मुंबईतील बहुचर्चित वर्सोवा-विरार सी लिंक प्रकल्पासाठी जपान सरकार महाराष्ट्र शासनासोबत सहकार्य करणार आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, मुंबई मेट्रो ३ तसेच बुलेट ट्रेन प्रकल्पांच्या कामाला गती दिल्याबद्दल जपानचे उद्योगमंत्री यासुतोशी निशिमुरा यांनी राज्य शासनाचे आभार मानले. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमुळे मुंबईची उत्पादकता तसेच कार्यक्षमता वाढणार असल्याचे जपानने विशेषत्वाने नमूद केले आहे. विरारपर्यंतच्या बहुतांश उपनगरांना सुपरफास्ट कनेक्टिव्हिटी प्रदान करणाऱ्या वर्सोवा-विरार सी लिंक प्रकल्पासाठी जपान आवश्यक ते सर्व सहकार्य करणार आहे. हा प्रस्तावित ४३ किलोमीटरचा आठ लेनचा मुंबईच्या पश्चिम किनाऱ्याजवळील उन्नत रस्ता महत्त्वाचा आहे. या प्रकल्पाचा प्रस्तावित खर्च ६३,४२६ कोटी रुपये इतका आहे. त्याला कॅबिनेटची मंजुरी मिळाली असून एमएमआरडीएद्वारे त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. 'जायका' कंपनीने मेट्रो-३, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, बुलेट ट्रेन इत्यादी प्रकल्पांना वित्तपुरवठा केला आहे. फडणवीस यांनी त्याबद्दल कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष नाकाझावा केईचिरो यांची भेट घेत आभार मानले. नागनदी तसेच मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्पांचे काम सुरू झाले असून त्यांची वॉर रूमच्या माध्यमातून देखरेख केली जाते. या सर्व प्रकल्पांना 'जायका'ने सहकार्य केले आहे. तशीच भूमिका कंपनीने वर्सोवा-विरार सी लिंकसाठी घ्यावी आणि मुंबई पूर्व्यवस्थापन प्रकल्पात मदत करावी, अशी विनंती फडणवीस यांनी केली.


मित्सुबिशी ही दिग्गज कंपनी महाराष्ट्रात सेमीकंडक्टर क्षेत्रात गुंतवणूक करण्यास उत्सुक असल्याचे वृत्त आहे. ही इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादन करणारी जगातील आघाडीची कंपनी आहे. या कंपनीने तळेगाव येथे प्लांट उभारला असून पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होऊन डिसेंबर महिन्यात तो कार्यान्वित होईल, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रात कंपनी विस्तार करण्याचा विचार करत असून सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये विशेषतः पुणे विभागात ती भागीदार शोधत आहे. भारत सरकारने सेमीकंडक्टर क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी विशेष अनुदानही जाहीर केले आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकारसोबत गुंतवणूक तसेच भागीदारीच्या संधी शोधत असल्याचे हरित हायड्रोजन, अमोनिया, नवीकरणीय ऊर्जा तसेच द्रवरूप नैसर्गिक वायू क्षेत्रात व्यस्त असलेल्या जपानमधील सर्वात मोठ्या वीजनिर्मिती कंपनी जेरा को इंकने म्हटले आहे. २०५० पर्यंत शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या उद्देशाशी हे सुसंगत आहे. 'जेरा' महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास इच्छुक असल्याचा फायदा राज्याला मिळणार असल्याचा दावा फडणवीस यांनी समाज माध्यमांवरून केला आहे. कंपनीकडे ८.७ ट्रिलियन डॉलरची एकूण मालमत्ता आहे.

मुंबई पूर शमन प्रकल्प, मेट्रो ११ मार्गिका, एआय सेंटर यासाठीही जपानी कंपन्यांनी स्वारस्य दाखवले आहे. सोनी, डेलॉईट, सुमिटोमो कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. सोनी समूहाला फिल्मसिटीत येण्याची तसेच आयआयटी मुंबईशी संशोधनाच्या क्षेत्रात सहकार्य करण्याची विनंती त्यांनी केली केली आहे. त्यांनी बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या सुमिटोमोला मुंबईत उपलब्ध असलेल्या संधींची माहितीही दिली. ग्रीन हायड्रोजन, कचऱ्यातून वीजनिर्मिती, लॉजिस्टिक, इलेक्ट्रिक व्हेईकल, हायस्पीड रेल्वे, स्टार्ट अप्स आदी क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत डेलॉईट कंपनी उत्सुक आहे. गुंतवणूक आकर्षित करणे तसेच प्रक्रियेतील अडथळे दूर करणे, यासाठी जपान केंद्रित समितीची स्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे गुंतवणूक करणे सुलभ होईल.

महाराष्ट्रात नेमकी किती गुंतवणूक होणार, हे स्पष्ट झाले नसले तरी जपानी कंपन्यांनी सर्वच क्षेत्रात गुंतवणूक करण्यात स्वारस्य दाखवणे, ही सकारात्मक बाब आहे. विशेषतः सेमीकंडक्टर क्षेत्रात गुंतवणूक आणण्यास महाराष्ट्र यशस्वी ठरल्यास फॉक्सकॉन तसेच वेदांता प्रकरणावरून महाराष्ट्राबाबत जगभरात गेलेला चुकीचा संदेश खोडून काढता येईल. बुलेट ट्रेन हा भारत-जपान संबंधांचा एक महत्त्वाचा भाग आहे. फडणवीस-शिंदे सरकारने बुलेट ट्रेन प्रकल्पाला दिलेली गती महाराष्ट्र-जपान हितसंबंधांना चालना देणारी ठरली आहे, असे म्हटल्यास काहीही वावगे ठरणार नाही.

**- अजय तिवारी**

## शब्दकोडे-१६७



आडवे शब्द - १. देखत, समोर ३. लपाछपीचा खेळ ६. हिंदीत अनेक अजरामर गाणी देणारा हरहुन्नरी कलावंत ११. तालुक्याचे वसुलीचे काम १३. फिरकी घेणे- -- काढणे १४. अबाधित, परंपरागत १६. असह्य वेदना १८. तृप्ती १९. जनावरांचा समूह २०. नृत्य २३. गर्दन २६. चौक २८. जोडीने केलेला सात पावलांचा प्रवास! २९. मुंबईजवळचे श्रीमंती बेट ३१. पारख अथवा पारख करण्याची दृष्टी ३३. अतिशय कमी वजन मोजण्याचे साधन, अशक्त प्रकृतीसाठी वापरले जाणारे विशेषभ- तोळा-- ३५. उपयोगाशिवाय ठेवलेले ३६. ज्याचा निरुपाय झाला आहे असा ३८. गवंडी ३९. सोन्याची कांब ४०. काही 'अर्थ' नाही हे सांगताना घेतले जाणारे देवाचे नाव ४३. गायनाची साथसंगत ४५. विशेष ४६. ढापाढापी ४८. पुन्हा पुन्हा जाणे-येणे, येरझार ५१. रास्त, योग्य ५२. स्वीकारणे ५४. पत्त्याच्या खेळात सरशीचे मोजमाप ५५. सरपणाचे दुकान ५६. गोंधळ ५८. श्रीविष्णूचे एक नाव ६२. निरागस, पोरवयाला शोभेल असे वागणे-बोलणे ६३. अतिशय वैराण, उजाड ६६. संधी ६७. वरचढ ६९. अखेर, शेवट ७०. वस्ती ७१. सूर्याचे एक नाव ७२. दुसऱ्याच्या मनातील भाव जाणणारा ७५. सुतळीचे कापड ७६. सामान ७७. संथ, सावकाश ७८. अंधार ७९. शूर ८२. प्रतीक्षा या पक्ष्यासारखी करावी! ८४. चर्चा ८७. तरतूद ८८. सर्वात जास्त उत्कृष्ट ८९. समुद्रकिनारा

उभे शब्द - १. जगबुडी २. माफी मागणे ३. बाई, स्त्री ४. 'राव' मेले तर हे वरच्या पदावर चढणार! ५. 'न्यूज चॅनेल'च्या जमान्यातही याचे स्थान अद्याप अढळच ६. निदान, कमीतकमी ७. भोजनानंतरची मुखशुद्धी ८. दुसऱ्याच्या डोळ्यात गेल्यास तेवढे दिसणारे ९. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे संगीत नाटकांमधील प्रमुख नाटक १०. रममाण, एकरूप १२. अभिप्राय १५. गरज, अडचण १७. मज्जाव २१. बारीक केलेली पोळी-भाकरी २२. मौजमजा २४. दृष्टीभेट २५. पदार्थासाठी बारीक चिरलेले मांस २७. कपडालत्ता ३०. ढंग, पद्धत ३२. धूलीकण ३४. सोज्वळ, प्रामाणिक ३७. सत्ता ४१. सुसर ४२. तांदूळ नव्यापेक्षा असा चांगला

## शब्दकोडे १६६ चे उत्तर

**आडवे उत्तर -**
१.मनोरंजक ४.साम दाम दंड भेद १०.राखीव ११.हस्त १२.गरुड १३.रजत १५.धडक १७.माका १८.माळ २१.आगळीवेगळी २३.फळ फळावळ २६.मळा २७.वाद २८.सलवार ३०.टसर ३२.पारदर्शक ३४.नमस्कार ३५.खास ३६.कनवाळू ३७.अर्थहीन ३९.पलायन ४१.खाजरा ४२.साकव ४४.गतकाल ४६.फाया ४८.मलमास ५१.नटराज ५४.उदास ५५.रसा ५७.सणवार ५८.मस ५९.मासलेवाईक ६२.कब्जा ६३.परस्वाधीन ६४.बालक ६५.सांब ६७.धमक ६९.बाक ७०.पगार ७१.वार्ता ७२.मनन ७३.व ७४.लक्ष्य ७५.डाकघर

**उभे**
१.मनोरमा २.रंगीत ३.कराल ४.सावध ५.दाहक ६.मस्त ७.डरकाळी ८.दगदग ९.भडक १४.जळफळाट १६.डफ १७.मागमूस १९.माफ कर २०.जवळपास २२.वेगवान २४.प्रदर्शन २५.मनोरथ २७.वादक २९.रमणीय ३१.समर्थ रामदास स्वामी ३३.कवायत ३५.खानसामा ३७.अज ३८.जीव ३९.फलटण ४०.नफा ४१.खाडा ४३.कसकस ४५.कानस ४७.यातना ४९.लस ५०.नववा ५२.रावा ५३.जरकबरक ५४.उमर ५६.साईबाबा ५९.मानधन ६०.लेखक ६१.कलकल ६३.परवा ६५.सांगाडा ६६.प्रहार ६८.मन

## राष्ट्रीय सेवा भारती -सेवाव्रती: शिबानी जोशी

राष्ट्रीय सेवा भरती ज्या प्रमुख चार मुद्द्यांवर काम करते त्यातील पहिला मुद्दा आहे जागरण म्हणजेच जागरूकता. याअंतर्गत विविध मासिकांचे प्रकाशन केले जाते. तसेच सेवा साधना नावाचा वार्षिक अंकही काढला जातो. 'सेवा दिशा' या अंकाचं पाच वर्षांतून एकदा, तर सेवापुंज या अंकामध्ये विविध संस्था संघटनांच्या यशस्वी आणि प्रेरक प्रयोगांची माहिती प्रकाशित केली जाते. तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल सामग्रीसुद्धा प्रकाशित केली जाते. देशातल्या प्रत्येक राज्यात सेवा भारतीची प्रांत रचना आहे. या सर्व प्रांतामधील समविचारी संस्थांना एकत्रित आणून वेळोवेळी 'सेवा संगम' या मंचाचे आयोजन केले जाते. तसेच दर पाच वर्षांनी 'राष्ट्रीय सेवा संगम' आयोजित केला जातो.

राष्ट्रीय सेवा भारतीचा दुसरा आयाम आहे अध्ययन. या अंतर्गत देशभरात निर्माण झालेल्या किंवा होत असलेल्या विविध सामाजिक समस्याच अध्ययन केल जाते. उदाहरणच द्यायचं झालं, तर ईशान्येकडील राज्यातील बरेचसे विद्यार्थी इतर राज्यातील छात्रावासांमध्ये राहायला जातात. त्यांचं शिक्षण पूर्ण झालं की, त्यांच्या स्वतःच्या आयुष्यात तसेच त्यांच्या माध्यमातून त्यांच्या गावात झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास केला गेला होता. नवी दिल्ली येथे २०१७ साली महिलांसाठी एक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी १५ ते ३५ वयोगटातील महिलांच्या सद्यस्थितीवर आधारित अभ्यास करण्यासाठी व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले होते. गेल्या काही वर्षापासून देशातल्या विविध भागांत पूर, दुष्काळ, भूकंप, मुसळधार पाऊस, वादळ अशा प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती येण्याचे प्रमाण वाढू लागले आहे ते पाहता 'आपत्ती व्यवस्थापन' हा देखील एक महत्त्वाचा आयाम राष्ट्रीय सेवा भारतीतर्फे आता राबवला जातोय. एखाद्या ठिकाणी नैसर्गिक आपत्ती ओढवली, तर त्वरित अनेक संस्था सक्रिय होऊन त्या ठिकाणी काम करत असतात. काही वर्षांपूर्वी नेपाळमध्ये आलेला भूकंप तसेच आसाममध्ये आलेले वादळ आणि पुरामुळे खूप नुकसान झालं होतं. त्या ठिकाणी सेवा भारतीच्या अनेक संस्थांनी मदत केली होती. नेपाळमध्ये एके ठिकाणी शाळा बांधण्यासाठी चार कोटी रुपयांची मदत दिली गेली होती. केरळमध्ये आलेल्या पुरामुळे नुकसान झालेल्या लोकांना घर बांधून देण्यात आली होती. काही वेळा त्या भागातल्या सरकारी अधिकाऱ्यांसोबत विचारमंथन करूनही गरज असेल, तिथे मदत केली जाते तसेच त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घेतला जातो. त्याशिवाय देशभरात सुरू असलेल्या स्वयंसहायता गटांना एकत्रित आणून त्यांनाही अधिक सबळ करण्याचं काम केलं जाते. नवीन प्रकल्प सुरू करणाऱ्या तसेच आधीचे प्रकल्प प्रभावीरित्या राबवण्यासाठी वैभव श्री पत्रिका तयार करण्यात आली होती. **(पूर्ण)**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंतीदिनी भक्ती-शक्ती दिन घोषित करण्याची मागणी

नाशिक । प्रतिनिधी



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी नशिक यांच्या मार्फत काल रोजी नाशिक येथील समितीचे राष्ट्रीय पदाधिकारी यांनी एकत्र येत राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंतीनिमित्त भक्ति-शक्ति दिन राज्य शासनाने घोषित करून राज्यातील लाखो भाविक-भक्तांच्या भावनांचा आदर करावा अशा मागणीचे निवेदन दिले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अध्यात्मिक क्षेत्रातील राष्ट्रसंत भगवानबाबा यांचे गौरवशाली कार्य ऐतिहासिक आहे. देशाला अध्यात्मिक ज्ञान मार्ग दाखवत भक्ति मार्ग, ज्ञान मार्ग, कर्म मार्ग या त्रिवेणी संगमाची संकल्पना सर्व सामान्य माणसाच्या जीवनात सुख शांती समाधान निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

भगवानबाबा हे महान तपस्वी, नवनिधी अष्टसिद्धी प्राप्त असून त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी धौम्यगडावर येवून धौम्यगडाचे भगवानगड असे नामकरण केले होते. तसेच माजी पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांनी तत्कालीन दुरसंचारमंत्री प्रमोद महाजन व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व.गोपीनाथ मुंडे यांच्याकडून बाबांच्या कार्याची महती ऐकताच भारत सरकारने राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या नावाने टपाल तिकीट प्रकाशित केले. अशा भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त देशातील लाखो भक्त भक्ति-शक्ति दिन साजरा करतात. तरी भाविकांच्या भावनांचा विचार करुन राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंतीदिनानिमित्त दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार प्रकाशित होणार्या ग्रेगोटिअल दिनदिर्शिकेमध्ये, तसेच विविध दिनदर्शिकेमध्ये, विविध सरकारी कार्यालयात राष्ट्रसंत भगवानबाबा जयंती भक्ती-शक्तीदिन म्हणून दर्शविण्यात येवून जयंती साजरी करण्याचे आदेश देण्यात यावेत अशी विनंती करण्यात आली आहे.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष शशिकांत घुगे, राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे, राष्ट्रीय उपाध्यक्ष मंदाताई फड, राष्ट्रीय सचिव बी. के. नागरे, विशाल पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष वैशाली कराड, राज्य उपाध्यक्ष रंगनाथ दरगुडे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# ब्रह्माकुमारी संस्थे तर्फे रक्षाबंधन सण वैश्विक स्तरावर साजरा

नाशिक । प्रतिनिधी



रक्षाबंधन हा सण बहिण भावाच्या पवित्र नात्याचा सण असून समाजात पावित्र्य टिकून राहण्यासाठी या सणाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. मूल्यनिष्ठ समाज निर्मितीमध्ये सुद्धा या सणाचे मोठे योगदान आहे. त्यामुळे या सणाला ब्रह्माकुमारी संस्थे तर्फे वैश्विक स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी आले आहे. मुख्यालय सहित विश्वातील १४० देशांमधील ८५०० पेक्षा अधिक सेवाकेंद्रामधुन हा सण मोठ्या श्रध्देने साजरा केला जातो. असे प्रतिपादन नाशिक जिल्हा प्रमुख ब्रह्माकुमारी वासंती दिदीजी यांनी केले.

रक्षाबंधनाचे औचित्य साधून पंचवटी येथील सेवाकेंद्रात कार्यक्रमाचे आयोजन दिनाक ३१ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थित खा. हेमंत आप्पा गोडसे, मा. आमदार बाळासाहेब सानप, बिजेपी शहर अध्यक्ष प्रशांत जाधव, बीजेपी सरचिटणीस सुनील केदार, युवा सेना विभागीय अध्यक्ष रुपेश पालकर, युवासेना जिल्हा समन्वयक राहुल वारुळे, बेंच ऑफ मॅजिस्ट्रेट ड. मिलींद बाबर, माजी उपमहापौर गुरमित बग्गा, युवक मित्रमंडल अध्यक्ष सोमनाथ बोडके, स्मितहर्ष एजुकेशन अकेडमी चे राजेश बेदमुथा, सामाजिक कार्यकर्ता ऋषिकेश आहेर, मा नगरसेविका वत्सलाताई खैरे, साय दै भ्रमरचे संपादक चंदुलाल शहा व रितेश शहा, सार्वजनिक वानालय विश्वस्त प्रा. सोमनाथ मुठाळ, उच्च न्यायालय आदेशित समिती सदस्य निशिकांत पगारे, नासिक स्टार न्यूज चे विजय ठाकुर व अदिती पेंढारे, साप्ताहिक नाशिक परिसर चे संपादक बी. के. दिलीप बोरसे, पुण्यनगरी चे प्रशांत भोर, दैं. भ्रमर चे मुकुंद बाविस्कर आदी मान्यवर व माध्यम प्रतिनिधींना आदरणीय वासंती दीदींनी राखी बांधून सुविचार कार्ड, ईश्वरीय भेट व प्रसाद देऊन सन्मानित केले. स्वागत डॉ. पवन हिंगणे यांनी तर कार्यक्रमांचे नियोजन बद्ध सुत्र संचालन ब्रह्माकुमारी पुष्पा दीदी यांनी केले.

# शिवसेना महिला आघाडीतर्फे अंबड पोलीस ठाण्यात रक्षाबंधन दिन





सिडको । प्रतिनिधी

शिवसेना महिला आघाडीच्या वतीने अंबड पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ व अन्य अधिकारी यांच्यासह कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन दिन साजरा करण्यात आला. शिवसेना महानगर प्रमुख अस्मिता देशमाने, शिवसेना बचतगट जिल्हा संघटक ज्योती फड, उपमहानगर प्रमुख (पश्चिम) रंजना सायखिंडकर, उपमहानगरप्रमूख (पुर्व) आरती गायखे, विधानसभा समन्वयक (पुर्व) डॉ.वृषाली व्यवहारे, विधानसभा संघटक (मध्य) अर्चना मगर, उपमहानगर प्रमुख (मध्य) किर्ती ठाकूर आदी उपस्थित होते.

# रविवारी 'रंगप्रिया' चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन

नाशिक । प्रतिनिधी



विदर्भातील अकोला येथील चित्रकर्ती प्रिया इंगळे यांच्या 'रंगप्रिया' या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिकरोड येथील पु. ना. गाडगीळ अँड सन्स शोरूममधील

कलादालनात होणाऱ्या या प्रदर्शनाचे उदघाटन उद्या रविवारी ( दि.३ ) सकाळी १० वाजता होणार आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार प्रफुल्ल सावंत, चित्रकर्ती व एमईटी - भुजबळ नॉलेज सिटीच्या मुख्य प्रबंधक डॉ. शेफाली भुजबळ उदघाट्क आहेत.

विशेष अतिथी म्हणून साहित्यिक संतोष हुदलीकर, भू- विकासक विनोद घाडगे उपस्थित रहाणार आहेत. नाशिकरोडला शिखरेवाडीसमोर, पासपोर्ट ऑफिसशेजारी स्टारझोन मॉलमध्ये हे पीएनजी कलादालन आहे. या प्रदर्शनात ६० पेक्षा अधिक चित्रकृती रसिकांना बघायला मिळतील. सर्वांसाठी सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत प्रदर्शन खुले राहील. या विनामूल्य चित्रप्रदर्शनाला दि.१४ सप्टेंबरपर्यंत नाशिककर रसिकांनी भेट द्यावी. असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



# लोहयुक्त व सकस आहार घ्या, तंदुरुस्त रहा : डॉ.जुनागडे

## सारडा कन्या विद्यालयात मार्गदर्शन

नाशिक । प्रतिनिधी

विविध कारणांनी मुलींमध्ये शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी राहते. मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या रक्तस्त्रावातून रक्त घटत असतांना, शरीरातील लोहाचे प्रमाणदेखील घटते. अशा परिस्थितीत मुलींनी लोहयुक्त व सकस आहार सेवन करतांना तंदुरुस्त राहावे, असा सल्ला प्रसिद्ध रक्तविकार तज्ज्ञ व लोटस हॉस्पिटल एड रिसर्च सेंटरचे प्रमुख डॉ. प्रितेश जुनागडे यांनी केले.

शालिमार येथील सारडा कन्या विद्यालय येथे जुनागडे हेल्थ फाउंडेशन, लोटस हॉस्पिटल आणि सारडा कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी मुख्याध्यापिका राजश्री चंद्रात्रे, उपमुख्याध्यापक गंगाधर बदादे, सहकार्यवाह मनिषा देशपांडे आदी उपस्थित होते.

डॉ.प्रितेश जुनागडे पुढे म्हणाले, मुलींमध्ये रक्ताची पातळी घटली व लोहाचे प्रमाण घटल्यास निमियासारखे गंभीर आजार उद्भवू शकतात. त्यामुळे नियमित व विशेषतः मासिक पाळीदरम्यान लोहयुक्त आहार महत्त्वाचा ठरतो. शाकाहारी स्वरुपाच्या आहारात लोहाचे प्रमाण व गुणवत्ता कमी असते. त्यामुळे शाकाहारी व्यक्तींमध्ये लोहाबाबत जनजागृती गरजेची आहे. तसेच लग्नाआधी अनुवंशिक रक्ताचे आजार असलेल्या थॅलेसिमिया, सिकलसेल निमिया यांबाबत चाचण्या करणे क्रमप्राप्त असल्याचे त्यांनी आवर्जुन नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल आपटे यांनी केले.

शाकाहारातून लोह मिळविण्यासाठी या पदार्थांचे करा सेवन

शाकाहारातून लोकयुक्त घटक मिळवायचे असतील तर काही विशिष्ट घटकांचा आहारात समावेश करणे गरजेचे असल्याचे डॉ.जुनागडे यांनी सांगितले. यामध्ये शेवग्याची शेंग, शेपू आणि पालकचे मिश्रण, गुळ शेंगदाण्याचे सर्व पदार्थ यासह सुख्या मेव्यामध्ये काजूचे सेवन उपयुक्त असल्याने या पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

# आजपासुन प्रजापिता ब्रह्माकुमारीतर्फे त्र्यंबकेश्वरला द्वादश ज्योर्तिलिंग दर्शन

नाशिक । प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे भव्य १२ (द्वादश) ज्योर्तिलिंग व शिव परमात्मा दर्शनचे आज दि.२ ते १४ सप्टेंबरपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. त्र्यंबकेश्वरला मेनरोडवरील हॉटेल त्रिवेणी समोर होणाऱ्या कार्यक्रमास संस्थेच्या संयुक्त प्रशासिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी संतोष दीदी अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी निःशुल्क आहे. दरवर्षी संस्थेतर्फे (द्वादश) ज्योर्तिलिंग दर्शन उपक्रमाचे जिल्ह्यात विविध ठिकाणी आयोजन करण्यात येत असते. त्याला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असतो.

त्र्यंबकेश्वर येथील महंत शंकरानंद सरस्वती (आनंद आखाडा), महंत धनंजय गिरी (निरंजनी आखाडा), महंत विष्णुगिरी (जुना आखाडा),महंत दुर्गानंद ब्रम्हचारी (अग्नि अखाडा), महंत उदयगिरी (अटल आखाडा), महंत गुरुप्रित सिंह (निर्मळ आखाडा) , महंत अजय पुरी (महानिर्वाणी आखाडा), महंत गोपालदास (बड़ा उदासिन आखाडा), देवस्थान विश्वस्त सत्यप्रिय शुक्ल, तृप्ती धारणे, त्र्यंबकेश्वर तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# म्हसरूळ ग्रामस्थांतर्फे श्रावणमासनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

## भजन मंडळ, संत महंत व मान्यवरांच्या उपस्थित विविध धार्मिक कार्यक्रम होणार

नाशिक । प्रतिनिधी

येथील म्हसरूळ ग्रामस्थांच्यावतीने श्रावणमास निमित्ताने म्हसरूळ गावातील पुरातन श्रीक्षेत्र दक्षिणमुखी मारुती मंदिरात येत्या सोमवार दि.४ पासून ते दि.११ सप्टेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांनी भव्य-दिव्य स्वरुपात अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती श्रीक्षेत्र दक्षिणमुखी मारूती मंदिर सेवा भक्त परिवार म्हसरूळ ग्रामस्थांच्यावतीने देण्यात आली.

या धार्मिकमय हरिनाम सप्ताह प्रसंगी हभप.आचार्य डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर, प.पू. संतोषगिरीजी महाराज, हभप. दामोधर महाराज गावले, ज्ञानेश्वर महाराज गटकळ, रामनाथ महाराज शिलापूरकर, धोंगडे महाराज, पुरुषोत्तम महाराज घुमरे, त्रंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ मंदिर संस्थेचे पदाधिकारी आदी थोर संत महंत, नामवंत किर्तनकार व प्रवचनकार, भजनी मंडळी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी म्हसरूळ भागातील तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी हरिनाम सप्ताहमध्ये उपस्थित राहून आयोजित धार्मिकमय कार्यक्रमांचा लाभ घ्यावा. असे आवाहन म्हसरूळगांव ग्रामस्थांच्यावतीने पुरातन दक्षिणमुखी मारुती मंदिर हरिनाम सप्ताह नियोजन भक्त परिवारचे रंगनाथ मोरे, संपतराव सातकर, रमेशराव बोरस्ते, प्रशांत मोराडे, सोमनाथ वडजे, सुदामराव भालेराव, अशोककाका मोराडे, उत्तमराव गोहाड, दिलीप मोराडे, जाधव, सुर्यवंशी, वडजे, बोरस्ते, सातकर, मोराडे आदींसह विविध सामाजिक संस्था व मंडळांकडून करण्यात आले आहे.

ॲड.व्ही.एन. पगारे
निशाणी नं.- ६/ड

## जाहिर नोटीस

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर सो यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क्र. २३२/२०२३

१. रत्नाबाई उर्फ अनिता दिगंबर सुर्यवंशी-पत्नी
२. मयुर दिगंबर सुर्यवंशी- मुलगा
३. वैष्णवी दिगंबर सुर्यवंशी-मुलगी
४. कोकीळाबाई भाईदास सुर्यवंशी- आई ...अर्जदार

॥ विरुध्द ॥

भाईदास यादव सुर्यवंशी(न्हावी) ...जाबदेणार
कै.दिगंबर भाईदास सुर्यवंशी (न्हावी) ...मयत

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट शिंदखेडा, सो यांचे कडे दि.१९/०८/२०२३ रोजी अर्जदार यांनी दि.कि.अ.क्र. २३२/२०२३ चा अर्ज कै. दिगंबर भाईदास सुर्यवंशी(न्हावी) यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयताचे शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच मौजे मुडावद येथील गट नं. ३९४/३अ क्षे.१ हे ०६ आर ही शेत मिळकत व ग.नं. ३९४/२ क्षे.० हे ६० आर मिळकत नगर भू.क्र.पाष्टे येथील ६७३ मधील क्षेत्र १६.८० चौ.मी मे न्यायालयातुन अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदर अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.०४/१०/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट शिंदखेडा यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- धुळे/शिंदखेडा
दिनांक-२१/०८/२०२३

शिक्का

कामगिरी कारकुन, सह न्यायदंडाधिकारी, शिंदखेडा
सहाय्यक अधिक्षक, सह न्यायदंडाधिकारी, शिंदखेडा

प्रोसेज जमा
ॲड.टी. व्ही. पाटील,साक्री
निशाणी नं.- ६

## दुरुस्त जाहिर नोटीस

**साक्री येथील मे.सह.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क. २६६/२०२२

श्री. महेश लोटन पाटील व इतर, उ. व. - २४, धंदा - शेती, राहणार - वसमार, ता.साक्री, जि.धुळे ...अर्जदार

॥ विरुध्द ॥

कोणीही नाही, - सामनेवाला

मयत - कै. लोटन भिवसन पाटील (नेरे) - (मृत्यू दिनांक - ३० /०७/२००५)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक २६/०७/२०२२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. लोटन भिवसन पाटील (नेरे) याचे दिनांक ३०/०७/२००५ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्री. महेश लोटन पाटील,- मुलगा,
२. सौ. भावना नितीन देवरे,- मुलगी,
३. सौ. शिल्पा श्रीकांत पाटील,- मुलगी,
४. सौ. सुचिता अभिमन्यु पाटील,- मुलगी,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०४/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-०१/०९/२०२३
आदेशावरुन,

शिक्का

क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री
सहाय्यक अधिक्षक, सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री

प्रोसेज जमा
ॲड.विकास एस. माळी, साक्री
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क. २०४/२०२३

श्रीमती. मंगलबाई दत्तु पवार व इतर, उ.व.-६४, धंदा-घरकाम, राहणार-धवळीविहीर, पो.जेबापूर, ता.साक्री, जि.धुळे ...अर्जदार

॥ विरुध्द ॥

कोणीही नाही, - सामनेवाला

मयत - कै. जितेंद्र दत्तु पवार -(मृत्यू दिनांक - १७/०४/२०१६)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक ०७/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. जितेंद्र दत्तु पवार याचे दिनांक १७/०४/२०१६ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. मंगलबाई दत्तु पवार,
२. श्रीमती. शकुंतला जितेंद्र पवार,
३. कु. प्रिया जितेंद्र पवार,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०७/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-०१/०९/२०२३
आदेशावरुन,

शिक्का

क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री
सहाय्यक अधिक्षक, सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री

प्रोसेज जमा
ॲड.श्री. प्रकाश डी. देवरे, साक्री
निशाणी नं.- ६

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज क्र. २७८/२०२३

श्रीमती. निंबीबाई फुलसिंग माळचे व इतर, उ.व.-४६, धंदा-काहीनाही, राहणार- डांगशिरवाडे, ता.साक्री, जि.धुळे ...अर्जदार

॥ विरुध्द ॥

कोणीही नाही, - सामनेवाला

मयत -कै. फुलसिंग मालसिंग माळचे - (मृत्यू दिनांक - १९/०६/२०२३)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक २३/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. फुलसिंग मालसिंग माळचे याचे दिनांक १९/०६/२०२३ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. श्रीमती. निंबीबाई फुलसिंग माळचे, - पत्नी,
२. श्री. पांडुरंग फुलसिंग माळचे, - मुलगा,
३. श्री. सुरेश फुलसिंग माळचे, - मुलगा,
४. सौ. प्रमिला सुनिल साबळे, - मुलगी,
५. सौ. मुलकनबाई मालसिंग माळचे, - आई,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. अर्जदारांना खातेनिहाय शासकीय, निमशासकीय व बॅकिंग कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०४/१०/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री,
दिनांक-०१/०९/२०२३
आदेशावरुन,

शिक्का

क. लिपीक, कामगिरी कारकुन, साक्री
सहाय्यक अधिक्षक, सह.दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री

## न्यूज कॉलम

### वाडीभोकर रोडवर वृद्धेची सोनपोत ओरबाडली

**धुळे ।** शहरातील देवपूरमधील वाडीभोकर रोडवर एका वृद्धेच्या गळ्यातील दीड लाखाची सोनपोत दोघांनी ओरबाडून पलायन केल्याची घटना ३० ऑगस्टला रात्री पावणेनऊच्या सुमारास घडली. श्रीमती प्रमिला पितांबर चौधरी यांच्या फिर्यादीनुसार, त्या बुधवारी रात्री पावणेनऊच्या सुमारास शहरातील वाडीभोकर रोडवरून घराकडे जात असताना दोन इसमांनी त्यांच्या गळ्यावर थाप मारून दीड लाखाची मंगलपोत जबरीने ओरबाडून नेली.

### चिकन विक्रेत्यावर मनपाची कारवाई

**धुळे ।** मानवी आरोग्याला धोका निर्माण होईल अशातऱ्हेने कोंबडीचे मांस विक्री केल्याच्या संशयावरून चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात मुस्ताक अहमद हाफीज अल्लाह शाह (रा. हाजीनगर, वडजाई रोड, धुळे) याच्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला. वडजाई रस्त्यावर ही कारवाई केली. यासंदर्भात महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक रवींद्र प्रकाश ठाकरे यांनी पोलिसात फिर्याद दिली.

# स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शिरपूर वरवाडे नगरपरिषदेतर्फे बक्षिस वितरण सोहळा संपन्न

**शिरपूर । प्रतिनिधी**



केंद्र शासनाच्या धरतीवर स्वच्छ भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणे सुरु असून त्या अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४, माझी वसुंधरा ४.०, व आझादी का अमृत महोत्सव - मेरी मिट्टी मेरा देश (मिट्टी को नमन विरोंको वंदन) हे अभियान राबविले जात असून माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, प्रशासक प्रमोद भामरे, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, मुख्याधिकारी तुषार नेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली २६ ऑगस्ट २०२३ रोजी आर. सी. पटेल मेन बिल्डिंग येथील राजगोपाल भंडारी हॉल येथे भव्य बक्षिस वितरण सोहळा संपन्न झाला. तसेच 'आर.आर.आर.' वस्तू वितरित करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी मुख्याधिकारी तुषार नेरकर, माजी उपनगराध्यक्ष राजगोपाल भंडारी, शिरपूर एज्युकेशन सोसायटी सीईओ डॉ. उमेश शर्मा, माजी नगराध्यक्ष संगिता देवरे, माजी उपनगराध्यक्ष सौ. छायाताई ईशी, माजी आरोग्य सभापती नाजेराबी शेख, प्रशासकीय अधिकारी संजय हासवानी, शिक्षण मंडळ सदस्य किशोर माळी, नोडल अधिकारी सागर कुलकर्णी, नगरपरिषदेचे सर्व विभागप्रमुख व अधिनस्त कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वृक्ष संवर्धनाचा संदेश देऊन करण्यात आला. मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी त्यांच्या प्रास्ताविकतेतून कार्यक्रमाचे महत्व आणि उद्देश स्पष्ट केला. माजी उपनगराध्यक्ष राजगोपाल भंडारी म्हणाले, पर्यावरणदूत यांनी समाजामध्ये जास्तीत जास्त जनजागृती करुन नगरपरिषदेस सहकार्य करावे.

शिरपूर एज्युकेशन सोसायटी सीईओ डॉ. उमेश शर्मा यांनी कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम दरम्यान नियुक्त करण्यात आलेल्या पर्यावरणदूत सौ.संगिता राजेंद्र देवरे, सौ.मीनाक्षी अंकुश राठी व सौ. दिव्या दीप जैन यांना आरआरआर वस्तू संकलन करणेकामी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत कापडी पिशवी बनविण्याची स्पर्धा राबविण्यात आली होती. त्या सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र तसेच विजेत्या स्पर्धक कामिनी देवेंद्र भावसार, कल्याणी ज्ञानेश्वर वाघ, श्वेता चेतन भावसार यांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले. मेरी मिट्टी मेरा देश (मिट्टी को नमन विरोंको वंदन) या अभियानांतर्गत नगरपरिषद संचलित सर्व शालेय स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्या सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात नविन पर्यावरणदूत यांना नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले. तसेच नगरपरिषदेतील सफाई कर्मचारी यांना उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल प्रमाणपत्र व पीपीई कीट वाटप करण्यात आले.

शहरातील गरीब व गरजू नागरिकांना स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत संकलित करण्यात आलेल्या आरआरआर (रिड्यूज, रियूज, रिसायकल) वस्तू जसे कि, कपडे, दफ्तर, खेळणी ई.वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरपूर वरवाडे नगरपरिषदेच्या आरोग्य सहाय्यक सौ. दिपाली साळुंके यांनी केले. आभार संजय हासवाणी यांनी मानले. सदर कार्यक्रम उपमुख्याधिकारी हर्षल भामरे, प्रशासन अधिकारी संजय हासवाणी, सीटी कॉर्डीनेटर दिव्या शिंदे, प्रोजेक्ट कॉर्डीनेटर सुषमा पवार, प्रज्ञाशील निकम, मनोहर थोरात, मयूर धाकड, मेहुल धाकड यांच्या सहकार्याने संपन्न झाला.

# राज्यातील दिव्यांग बांधवांना अंत्योदय योजनेचा लाभ द्यावा: मंत्री भुजबळ

**गोदामांच्या दुरुस्तीकरीता डिपीसीतून निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करावा**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरातील दिव्यांग नागरिकांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ देण्यासाठी विशेष अभियान राबविण्याचे आदेश काल अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले आहेत. अंत्योदय योजनेचा जर इष्टांक संपला तर प्राधान्य कुटुंब योजनेतून दिव्यांग बांधवांना अन्न धान्य देण्यात यावेत मात्र कोणत्याही परिस्थितीमध्ये अन्न धान्यापासून दिव्यांग वंचित राहणार नाही, असे नियोजन करण्याचे निर्देश देखील मंत्री भुजबळ यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या आढावा बैठकीत मंत्री भुजबळ यांनी संबंधितांना निर्देशित केले. अन्न नागरी पुरवठा विभागाच्या गोदामांची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून आवश्यकतेनुसार अर्थ सहाय्य मिळण्यासाठी विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना मंत्री छगन भुजबळ यांनी काल दिल्या.

मंत्री भुजबळ म्हणाले, जनतेला रास्त भाव दुकानांमधून वेळेवर शिधा उपलब्ध करुन देण्याची दक्षता विभागाने घ्यावी तसेच या धान्यांचा साठा करण्यासाठी गोदामांना सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. तरी विभागाच्या सर्व गोदामांची दुरुस्ती प्राधान्याने करुन घ्यावी. त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धता जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्यासाठी तसा प्रस्ताव तातडीने सादर करावा. शिवभोजन केंद्राच्या माध्यमातून गरजूंना सहाय्य होत असून सर्व शिवभोजन केंद्र सुरळीतरित्या सुरु असण्याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. तसेच जे शिवभोजन केंद्र मुदतीत सुरु झालेले नाही, याबाबत कालमर्यादेत माहिती मागवून अद्याप सुरु झालेले नाहीत अशी केंद्रे रदद् करावीत. शिवभोजन केंद्रांची देयके वेळेत द्यावीत. राज्यातील जनतेला अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या माध्यमातून अधिक तत्परतेने गुणवत्तापूर्ण सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विभागाचे संगणकीकरण करून अधिक पारदर्शकता आणावी अशा सूचना मंत्री भुजबळ यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

# आपल्या कलेची कदर करणाराच स्वतःची ओळख निर्माण करतो : सुभाष शिंदे



**एसएसव्हीपीएसमध्ये कला मंडळाचे उद्घाटन**

**धुळे । प्रतिनिधी**

येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालयात कला मंडळाचे उद्घाटन खान्देशातील सुप्रसिद्ध कलाकार सुभाष शिंदे यांच्या हस्ते मंगळवारी २९ ऑगस्टला करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर पाटील होते.

कलेची देवता मानल्या गेलेल्या नटराज यांचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन पार पडले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, खान्देशातील सुप्रसिद्ध कलावंत सुभाष शिंदे, विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मोहन पावरा, ज्येष्ठ प्राध्यापक डॉ .रवींद्र वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जितेंद्र पाटील, आय. क्यू.ए.सी.चेअरमन डॉ. संजय घोडसे, क्रीडा विभागाचे प्रमुख डॉ. नरेश बागल, डॉ. अनिलकुमार पगारे, डॉ. क्रांती पाटील आदी उपस्थित होते. कला मंडळाचे अध्यक्ष डॉ. अभय कुमार खैरनार यांनी प्रास्ताविक केले. वाद्य वादनात घनशाम माळी, तेजस देवरे यांनी आपली कला प्रदर्शित केली. सोलो डान्सच्या सहाय्याने जुई डंबिर हिने आपल्या नृत्य कलेचे प्रदर्शन केले. नुकत्याच जिल्हा युवा महोत्सवात समुह नृत्य कला प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून राज्यस्तरावर निवड झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या बिराडे सौरभ, योगेश महाले, देवेंद्र पाटील, सौरभ चौधरी, भूपेंद्र बार्गे, रोहित सूर्यवंशी, विकास राजपूत, स्नेहा बडगुजर, प्राप्ती चौहान, कल्याणी चौधरी, निकिता शेंडगे, लीना हिरे यांनी आपल्या नृत्यातून वारकरी संप्रदायाची जीवन शैली अभिव्यक्त केली. या कार्यक्रमाचे उद्घाटक खानदेशातील सुप्रसिद्ध सिनेकलावंत सुभाष शिंदे यांनी आपल्या व्याख्यानात आपल्या कलेची कदर करणाराच स्वतःची ओळख निर्माण करतो, असे प्रतिपादन केले. त्यांनी एकपात्री नाट्यप्रयोग सादर केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर पाटील यांनी संबोधन केले. आभार प्रदर्शन डॉ. क्रांती पाटील आणि सूत्रसंचालन डॉ. नीलेश पाटील यांनी केले. कला मंडळ प्रमुख डॉ. अभय कुमार खैरनार, डॉ. पौर्णिमा वानखेडे , डॉ. क्रांती पाटील, डॉ. सचिन जाधव, डॉ. नीलेश पाटील, डॉ. भाग्यश्री पाटील, डॉ. मच्छिंद्र ठाकरे यांबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश वाटपाचा स्तुत्य व अभिनव उपक्रम

**शिरपूर । प्रतिनिधी**

स्व. तपनभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने येथील आर. सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आई किंवा वडील नसलेले तसेच आर्थिक परिस्थितीने कमकुवत असे पाचवी ते दहावीतील एकूण १११ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप कार्यक्रम विद्यालयामार्फत राबविण्यात आला.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून तालुक्याचे आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटी ट्रस्टी सौ. कृतीबेन भूपेशभाई पटेल, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्या डायरेक्टर कु. द्वेता भूपेशभाई पटेल, संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, जि.प. उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, पंचायत समिती सभापती प्रतिनिधी वसंत पावरा, गोपाल भंडारी, विजय अग्रवाल, पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील, सामाजिक कार्यकर्ते गोपाल चौधरी, जाकीर शेख, संस्थेचे अकॅडमिक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, प्राचार्या श्रीमती शारदा शितोळे, सौ. पौर्णिमा पाठक, प्राचार्य पी. आर. साळुंखे, मुख्याध्यापक सी. डी. पाटील, मुख्याध्यापक मनोज पाटील, पर्यवेक्षक एन. ई. चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

आई किंवा वडील नसलेल्या ५ वी ते १० वी तील ८६ विद्यार्थी तर आर्थिक परिस्थितीने गरीब असलेले २५ असे एकूण १११ विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

# गंगापूररोड परिसर गुन्हेगारी मुक्त करणार

**पो.नि. निंबाळकर यांचे प्रा.डॉ. वर्षा भालेराव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळास आश्वासन**

**नाशिक । प्रतिनिधी**



गंगापूररोड परिसरातील चोऱ्या तसेच गुन्हेगारीचे प्रकार रोखण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याचे तसेच टवाळखोरांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन गंगापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत निंबाळकर यांनी दिले आहे.

नाशिक शहराबरोबरच गंगापूररोड परिसरातही मंगळसूत्र खेचणे, घरफोडी, हाणामारी अशा घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. चौकांचौकांत पार्किंगचा प्रश्न बिकट होत आहे. नागरिकांना रस्त्यावरून पायी चालणेही कठीण झाले आहे. या सर्व प्रकारांकडे पोलिसांचे लक्ष वेधण्यास यावर कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी गंगापूररोड आणि परिसरातील नागरिकांच्या शिष्टमंडळाने भाजपाच्या महानगर उपाध्यक्ष आणि माजी नगरसेविका प्रा.डॉ.वर्षा भालेराव यांच्या नेतृत्वाखाली गंगापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत निंबाळकर यांची भेट घेतली असता यावेळी हे निंबाळकर बोलत होते.

गंगापूररोड परिसरात गस्त वाढविण्यात येईल. नागरिकांच्या कोणत्याही समस्या असतील तर त्यांनी थेट माझ्याशी फोनवर संपर्क साधावा किंवा व्हॉट्सपवर मेसेज व लाईव्ह लोकेशन पाठवल्यास त्याचे तातडीने आम्ही निराकरण करू. असे आश्वासनही निंबाळकर यांनी शिष्टमंडळास दिले. यावेळी माजी आमदार डॉ. निशिगंधा मोगल, मध्य विधानसभा मतदार संघाचे प्रभारी अनिल भालेराव, भीमराव कडलग, सुधाकर पुंडे, शरद काळे, प्रविण अहिरे, सोनल दगडे, बापू कोतवाल, बाळकृष्ण धामणे, दीपाली अहिरे, महेश मोरे, दिनकर बस्ते, मनोज काळे, अशोक कडलग, भास्कर गिते आदी उपस्थित होते.

# श्रावणानिमित्त चेतनानगरात धार्मिक कार्यक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**



आर्ट ऑफ लिविंग प्रणित, वैदिक धर्म संस्थान, बँगलोर यांच्या वतीने श्रावण मास रुद्र पूजा ओम नमः शिवाय या पवित्र मंत्रोच्चारात संपन्न झाला. चेतनानगरातील श्रीकृष्ण मंदिरात परिसरातील सर्व रहिवाशांना आनंद, सुख शांती मिळावी तसेच रोगराई, नकारात्मक गोष्टींपासून मुक्ती मिळावी म्हणून माजी नगरसेविका संगिता जाधव यांनी स्वतः यजमान पद घेऊन रुद्र पूजा केली.

रुद्र पूजा श्री श्री रविशंकर आश्रमातील स्वामी प्रणवानंद व वेदा पंडित यांच्या सानिध्यात पवित्र मंत्रोच्चारात आणि उत्साहात संपन्न झाली. पूजेच्या यशस्वीतेसाठी निताजी घुमरे, निलीमा गायधनी, संगीता चव्हाण, सुभाष कोल्हे, किरण गावंडे, प्रदीप गोसावी, श्री व सौ. मंगेश जाधव, योगिता गावंडे, भोजराज, निनाद व उमा यांनी अथक परिश्रम घेतले. या पूजेसाठी परिसरातून असंख्य नागरिक तसेच स्मृती ठाकूर व आर्ट ऑफ लिविंगचे. शिक्षक, स्वयंसेवक, भाविक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलीचे अपहरण; संशयितावर गुन्हा

**धुळे ।** शहरातील जुने धुळे परिसरात वास्तव्यास असलेल्या अल्पवयीन मुलीचे तरुणाने अपहरण केल्याची फिर्याद आझादनगर पोलिस ठाण्यात दाखल झाली. फिर्यादीनुसार, २१ ऑगस्टला दुपारी अडीच ते तीनदरम्यान त्यांच्या मुलीने आजीस तुम्ही जेवणासाठी बसा, मी बाथरूमला जावून येते, असे सांगून घरातून गेली. बराच वेळ झाल्यावरदेखील ती न परतल्याने तिचा नातेवाईकांसह परिसरात शोध घेतला, मात्र ती कुठेही आढळली नाही. तिला मनोहर कैलास महाले (रा. शहादा पिंपरी जि.नंदुरबार) या तरुणाने फूस लावून पळवून नेल्याचा संशय आहे. फिर्यादीवरून आझादनगर पोलिस ठाण्यात मनोहर महाले याच्याविरूद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल झाला.



# कृषि पायाभूत सुविधा निधीबाबत कार्यशाळा संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयामार्फत जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्याची कृषि पायाभूत सुविधा संदर्भात कार्यशाळा कृषि चिकित्सालय, प्रिंपी ता.धुळे येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कुर्बान तडवी, प्रकल्प संचालक (आत्मा) नवनाथ कोळपकर, उपविभागीय कृषि अधिकारी बापू गावित,नोडल अधिकारी स्मार्ट प्रकल्प गोरख चौधरी, सेंद्रिय कृषि भूषण शेतकरी दिलीप पाटील, वाल्मिक पाटील, शेतकरी उत्पादक कंपनी लामकानीचे अध्यक्ष डॉ.नेवाडकर, उमरपाटा शेतकरी उत्पादक कंपनीचे श्री.निंबाळकर, मेहेरगावचे दिनेश पाटील, पाझराकानचे श्री.सोनवणे, तालुका कृषि अधिकारी वाल्मिक प्रकाश, सुरेंद्रनाथ शिंदे, मंडळ कृषि अधिकारी श्री. शिवदे, श्री. पाटील, सर्व कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, सर्व डीआरपी, माविम, उमेदचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आत्माचे उपप्रकल्प संचालक श्री.विनय बोरसे यांनी उपस्थित शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांशी संवाद साधतांना त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले व कर्ज धारक व भविष्यात कर्ज घेवू इच्छीतांना ३ टक्के व्याज दरावर सवलत घेणे बाबत आवाहन केले. विभागीयस्तरावरील अर्थ शास्त्रज्ञ दिपाली साळुंखे यांनी पोर्टलवर अर्ज करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी श्री.शर्मा यांनी कृषि पायाभूत सुविधा निधीसाठी बँकाची भूमिका बाबत माहिती दिली.

# कांदा अनुदानापासून शेतकरी वंचित राहायला नको

**पालकमंत्र्यांच्या संबंधित यंत्रणेला सूचना**

**नाशिक । प्रतिनिधी**



कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून कांदा अनुदान शेतकऱ्यांना मिळण्यासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. सहकार विभागाच्या उपनिबंधक कार्यालयातर्फे जिल्ह्यातील एक लाख ७२ हजार १५२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ४३५ कोटी ६१ लाख २३ हजार ५७८ रुपये वर्ग करण्यासाठी आयसीआयसीआय बँकेच्या संकेतस्थळावर याद्या 'अपलोड' करण्याचे काम बुधवारी उशिरापर्यंत सुरू होते. हे कामकाज विभागासह बाजार समित्यांचे सचिव आणि कर्मचाऱ्यांनी केले आहे.

कांदा उत्पादक शेतकरी या मदतीपासून वंचित राहत असेल किंवा काही तांत्रिक अडचणी येत असल्यास शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे. शेतकरी मदतीपासून वंचित राहिला नको याबाबत सबंधित यंत्रणेला देखील सूचना मंत्री भुसे यांनी दिल्या आहेत. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी हा अनुदानापासून वंचित राहणार नाही. शेतकऱ्यांना दोन टप्प्यात हे अनुदान देण्यात येणार असून दुसरा हप्ता देखील लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. योग्य खाते क्रमांक नसल्यास संबंधित शेतकऱ्यांशी संपर्क करून योग्य खाते क्रमांक घेण्याच्या सूचना देखील अधिकाऱ्यांना केल्या आहेत.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून राज्य शासनाने शेतकऱ्यांना मदत जाहीर केली. त्यानुसार ती मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. राज्यात फेब्रुवारी २०२३ च्या सुरवातीला कांद्याच्या भावात मोठ्या प्रमाणात घसरण झाली होती. शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी सहकारी आणि खासगी बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक अथवा 'नाफेड'कडे १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ ला विकलेल्या लेट खरीप कांद्याला अनुदान देण्याचा निर्णय सरकारने २७ मार्च २०२३ ला घेतला. क्विंटलला ३५० रुपयेप्रमाणे २०० क्विंटलपर्यंत अनुदान सरकारने जाहीर केले. सरकारने घोषणा केल्यानुसार ३ ते ३० एप्रिल दरम्यान शेतकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्रस्तावाची तपासणी सरकारी लेखापरीक्षक यांच्यातर्फे करण्यात आली. त्यानंतर आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदान वर्ग करण्याची प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे सुरू होणार आहे.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र

शनिवार, दि. २ सप्टेंबर २०२३





# श्री संस्कार मतिमंद मुलींच्या बालगृहात रक्षाबंधन साजरी

## जिल्हा परिषदेचे सीईओ श्री शुभम गुप्ता यांची सामाजिक बांधिलकी !






















धुळे । जिल्हा

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांनी सामाजिक बांधिलकी जपत श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृहात बुधवारी सकाळी सपत्नीक भेट देत मुलींकडून राखी बांधून राखी पौर्णिमा साजरा केली. वरिष्ठ अधिकारी यांची ही एक छोटीशी भेट काही काळासाठी का असेना मात्र त्या अनाथ, मतिमंद मुलींच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करून गेली. भाऊ-बहिणीच्या नात्याला आणखी घट्ट करणारा राखीपौर्णिमा हा सण. या सणाच्या दिवशी प्रत्येक घरातच उत्सुकता आणि आनंदी वातावरण पाहायला मिळते. मात्र, दुर्दैवाने ज्यांच्यावर अनाथ होण्याची वेळ आलेली आहे, त्या चिमुकल्यांनी हा सण कसा साजरा करावा? काही अनाथ मुलींना तर रक्षाबंधन म्हणजे काय असते हे देखील माहीत नसते. अशावेळी सामाजिक उत्तर दायित्व म्हणून धुळे शहरातील बालाजी नगर, साक्री रोड येथील श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह व कार्यशाळा येथे धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता यांनी बुधवारी सकाळी सपत्निक भेट दिली. येथील अनाथ आणि मतिमंद मुलींसोबत राखी पौर्णिमा सण साजरा केला. इथल्या मुलींनी देखील हक्काने सीईओ श्री गुप्ता यांना राखी बांधली. श्री. गुप्ता यांनी संस्थेतील निवासी गृह, स्वयंपाक गृह, तसेच मुलींच्या शैक्षणिक दिशा प्रकल्पाची व कार्यशाळेतील व्यावसायीक प्रशिक्षणाबाबत विचारणा व पाहणी केली. मुलींनी बनवलेल्या विविध वस्तू मुलींकडून श्री गुप्ता यांना भेट म्हणून देण्यात आल्या. यावेळी त्यांनी संस्थेचे व सर्व कर्मचारी वर्गाचे कौतुक करून मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी श्री. मनीष पवार, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. विठ्ठल घुगे ,वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता श्री. मालसिंग पावरा, यमुनाई संस्थेचे श्री. सुनिल वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
शनिवार, दि. २ सप्टेंबर २०२३





# कोरडा दुष्काळ जाहीर करा : बाळासाहेब भदाणे

## तरवाडे गावात केला रास्ता रोको



















धुळे । शहर धुळे तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसाठी तरवाडे (ता.धुळे) येथे इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे बाळासाहेब भदाणे यांच्या नेतृत्वात रास्ता रोको करण्यात आला. धुळे तालुक्यासह जिल्ह्यात पावसाने पाठ फिरविल्याने परिस्थिती भीषण व भयावह आहे. पिके करपली, जलसाठे आटलेत, जनावरांचा चाराही संपलाय. शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहिर करत, शेतकरी बंधूंना मदतीचा हात द्यावा. आतापासूनच उपाययोजनांचे नियोजन करावे. रस्त्यावर उतरुन अजुन तिव्र आंदोलन छेडण्याची वेळ शासनाने आणू नये. तात्काळ दुष्काळ जाहिर न केल्यास धुळे तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी चक्का जाम केला जाईल, असा इशारा यावेळी बाळासाहेब भदाणे यांनी दिला. बाळासाहेब भदाणे मित्र परिवारातर्फे झालेल्या या चक्का जाम आंदोलनामुळे महामार्गावर वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला संबोधीत करताना बाळासाहेब भदाणे यांनी, शेतकरी बंधूंनो हवालदिल न होता परिस्थितीशी दोन हात करा, सर्व पर्याय संपले तरीही टोकाचे पाऊल मात्र उचलू नका, असे भावनिक आवाहनही केले. यावेळी इंदुबाई भदाने प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, जि.प. सदस्य प्रभाकर पाटील, पं.स.उपसभापती देवेंद्र माळी, पं.स. सदस्य बाबाजी देसले, माजी सभापती नारायण देवरे, बोरकुंड सरपंच सुनिता हेमंत भदाणे, नाणे सरपंच अजय राजपूत, प्रकाश भदाणे, होरपाडाचे माजी सरपंच रवींद्र कठाळे, राजेंद्र मराठे, रविबाबा माळी, जितू पाटील, बोरकुंड सोसायटी चेअरमन अनिल भदाणे, मोरदड उपसरपंच गोविंद पाटील, महेंद्र पाटील चांदे, गणेश पाटील, भरत राजपूत, अमोल पाटील, आदींसह बाभुळवाडी, हडसुणे, मोरदड, मोरदड तांडा, नाणे, सिताणे, तरवाडे, धाडरे, धाडरी, हेद्रुण आदी गावांतील व बोरी पट्ट्यातील विविध पदाधिकारी तसेच तालुकाभरातील शेकडो शेतकरी बंधू उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ